**S.N.D.T. Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879
Fax : + 91 22 2201 6226

A- Grade (CGPA 3.08)

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

अॅफी./जन.१/२०२३-२४/ 876

दिनांक : २१ जुलै, २०२३

**परिपत्रक**

**प्रति,**
**प्राचार्य/प्रभारी प्राचार्य/विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये**
**यांच्या माहितीस्वत व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता सादर**

महोदय,

श्रीमती ना.दा.ठा. महिला विद्यापीठाची स्थापना १९१६ मध्ये झाली असून आता त्याच्या गौरवशाली अस्तित्वाची १०७ वर्षे पूर्ण होत आहेत. थोर समाज सुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी व सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठाची स्थापना केली. आज विद्यापीठाचा परिसर हा चर्चगेट,जुहू, पुणे, बलारपूर आणि श्रीवर्धन येथे विस्तारलेला आहे आणि विद्यापीठाची संलग्न महाविद्यालये ही भारतभर पसरलेली आहेत. याच विद्यापीठाचा आपण एक भाग असल्यास आम्हाला आनंद व अभिमान आहे.

सदर परीपत्रद्वारे खालील बाबी आपल्या महाविद्यालयात उपलब्ध/पुर्ण कराव्यात

१) भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा फोटो (Size 297mm x 420 mm (A3)) फ्रेम करून प्राचार्य कक्ष तसेच
दर्शनी भागी लावण्यात यावा.

२) महाविद्यालयाच्या नावाचा फलक हा मोठा तसेच दर्शनी भागी लावण्यात यावा व त्यावर "एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबईशी संलग्नीत" असे नमुद असावे.

३) महाविद्यालयात राबविण्यात येणा-या कार्यक्रमांच्या शुभारंभ वेळी विद्यापीठ गीत सामुहीकरीत्या गाण्यात यावे.
(विद्यापीठ गीत विद्यापीठाच्या वेब साईटवर उपलब्ध आहे)

४) विद्यापीठ गीत महाविद्यालयाच्या दर्शनीभागी फ्रेम करून लावण्यात यावे.

वरील विषयी आवश्यक कार्यवाही करावी.

आपले विश्वासू

21/7/23

(प्रो. मेधा तापिआवाला)
अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अति.भार)

d:\vinita\mis\mis 2022-2023\circular.docx